# बजाज इलेक्ट्रिकल्सची हिरकमहोत्सवी देदीप्यमान वाटचाल

■ मुंबई : बजाज इलेक्ट्रिकल्स या घरगुती विद्युत उपकरण आणि लायटिंग साहित्य उत्पादक कंपनीने २०१३-१४ साली आपले हिरकमहोत्सवी वर्ष साजरे केले. या संपूर्ण वाटचालीत कंपनीने देदीप्यमान व्यावसायिक कामगिरी केली आहे.

आतापर्यंत कंपनीने ३३८७.५७ कोटींची वार्षिक उलाढाल साध्य केली असून देशाच्या कानाकोपऱ्यात विस्तार केला आहे. कंपनीकडे सध्या २२०० वितरण आणि ४१०० अधिकृत विक्रेते आहेत. ३० सप्टेंबर २०१३ रोजी समाप्त सहामाहीत कंपनीने २४.५ टक्के वाढीने १७४३.६७ कोटी रुपये उत्पन्न मिळवले. कंपनीच्या विकासात कंपनीच्या प्रत्येक शाखेचे बहुमूल्य योगदान आहे. मुंबई बाजारपेठेतील नवनव्या संधीचा लाभ कंपनीला नेहमीच झाला, असा अभिप्राय कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज यांनी दिली आहे.बजाज इलेक्ट्रिकल सोबत असलेल्या सर्व भागीदारांचे भविष्य उज्वल व्हावे अशी मनोकामना कंपनीचे जेएमडी अनंत बजाज यांनी केली.